कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

अर्थशास्त्र विभाग,

विकासाचे अर्थशास्त्र, बीए भाग ३, सेमिस्टर नंबर ५,

"नोट्स"

विषय शिक्षक :डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे (८०५५८०८७७२)

## अर्थशास्त्रीय संशोधन म्हणजे काय हे सांगून संशोधनाची उद्दिष्टे विशद करा.

- **प्रस्तावना:**

Research या इंग्रजी शब्दावरून संशोधन हा पर्याय शब्द उपयोगात आणला जातो. जी वस्तु अस्तित्वात आहे पण ज्ञात नाही अशा वस्तूला शोधून काढणे म्हणजे संशोधन होय. म्हणजेच संशोधन हे नवीन ज्ञानाचे संपादन असते आणि जुन्या ज्ञानाचे परीक्षण करणे हे असते. संशोधन या शब्दाला शोध, अन्वेषण असे शब्द वापरले जातात. मराठीतील संशोधन हा शब्द सं + शोधन या दोन शब्दांनी बनलेला आहे. सं ह्या शब्दाचा अर्थ संपूर्ण आणि शोधण या शब्दाचा अर्थ जी शोध घेणे. नैसर्गिक शास्त्र व सामाजिक शास्त्रांमध्ये अनेक प्रश्न आणि समस्या निर्माण झालेल्या असतात अशा प्रश्न आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी संशोधन खूप उपयुक्त ठरतो. संशोधन ही न संपणारी प्रक्रिया असते त्याने नावीन्याचा शोध घेणे हा संशोधनाचा मुख्य हेतू असतो.

- **अर्थशास्त्रीय संशोधनाची व्याख्या किंवा अर्थ:**

पुढील काही महत्त्वाच्या व्याख्या संशोधनाबाबत केलेले आहेत.

१. सी. ए .मोझर : "सामाजिक घटना आणि समस्या याविषयी नवीन ज्ञान मिळवण्यासाठी पद्धतशीरपणे केलेल्या विश्लेषणाला सामाजिक संशोधन असे म्हटले जाते".

२. जे डब्ल्यू बेस्ट: " संशोधन हे पद्धतशीर वस्तुनिष्ठ विश्लेषण आणि नियंत्रित निरीक्षणाचे अभिलेखन असते यायोगे सामान्यीकरणाचा विकास भविष्यकालीन तत्वे अथवा सिद्धांताचे परिणाम आणि कदाचित शेवटच्या घटनांचे नियंत्रण होईल."

३. डॉ. इ. एस बोगार्डस: "सामाजिक संशोधन म्हणजे संघटित व्यक्तीच्या जीवनात मुलगामी आणि प्रक्रिया कार्यरत असतात त्याचे संशोधन करणे होय".

४. पी. व्ही.यंग : "संशोधन ही सामाजिक जीवनाच्या अभ्यासाची, विश्लेषण करण्याची व संकल्पीकारणाची योग्य पद्धत आहे. ज्यायोगे ज्ञानाचा विस्तार, बदल करणे, बिनचूक करणे अगर पडताळणी करता येते; जेणेकरून ते ज्ञान सिद्धांताच्या बांधणीत मदत करते अगर कलेत प्रत्यक्षात येते".

- **संशोधनाची उद्दिष्टे:**

संशोधनाची महत्त्वाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे.
२. नवीन सिद्धांताचा विकास करणे हा संशोधनाची उद्दिष्टे आहे.
३. संशोधनाची उद्दिष्टे ती मानवी कल्याणावर परिणाम करणाऱ्या विविध घटनांचा बारकाईने अभ्यास करणे हा असतो.
४. सामाजिक घटना, सामाजिक व्यवहार, सामाजिक समस्या यांचा अभ्यास करणे हा संशोधनाचा उद्देश असतो.
५. संशोधनाच्या सुरुवातीला गृहीतके हे निश्चित करावी लागतात.
६. संशोधनानंतर गृहीतकं हे खरे अगर खोटे ठरू शकतो.
७. संशोधनामध्ये व्यक्तिगत वर्तणूक आणि सामाजिक कृत्यांचा अभ्यास केला जातो.
८. संशोधन प्रक्रियेतील विकासाने गुंतागुंतीच्या समस्या सोडवता येतात.
९. संशोधनाचा उद्देश विविध घटकातील अगर त्यांच्यातील कार्यकारणभाव स्पष्ट करण्याचा असतो.
१०. अधिक अचूक माहिती प्रसिद्धीच्या झोतात आणणे संशोधनाचे उद्देश असतो.

- **सारांश :**

जे अस्तित्वात आहे पण ज्ञात नाही अशा घटकांचा शोध घेणे म्हणजे संशोधन होय. आधुनिक काळात सामाजिक, आर्थिक, राजकीय, संस्कृतीक, धार्मिक क्षेत्रामध्ये अनेक समस्यांची निर्मिती होत आहे. अशा समस्यांचे निराकरण करणे. योग्य अशा प्रश्नांची सोडवणूक करून समाज उपयोगी माहिती उपलब्ध करून देण्याचे काम संशोधन करीत असते.